# प्रेस नोट

# महाराष्ट्र पोलीस सिटीझन पोर्टल

# उद्‌घाटन समारंभ

जा.क्र. ७३९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/१०/२०१७

भंडारा:— भंडारा जिल्हयात पोलीस दलातर्फे दिनांक ३०/१०/२०१७ रोजी सिटीजन पोर्टल ऑनलाईन सुवीधा केंन्द्र KIOSK CENTER चे पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा येथे मा. पोलीस अधीक्षक विनीता साहू यांच्या शुभहस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. पोलीस अधीक्षक विनीता साहू, अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधिक्षक (गृह) कुलकर्णी, आर्थीक गुन्हे शाखा उपविभागीय पोलीस अधिकारी नागरे, स्थागुशा भंडारा पोनी. घुसर, जिवीशा पोनी. सिडाम, तसेच सर्व पोस्टेचे अधिकारी तसेच पत्रकार बंधु उपस्थित होते.

पोलीस कार्यालय येथे नागरीकांना ऑनलाईन तक्रार करण्याची सुवीधा व्हावी याकरीता महाराष्ट्र पोलीस सिटीझन पोर्टल तयार केले आहे

www.mhpolice.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नागरीकांना तक्रार नोंदविता येईल. प्रथम खबर, अटक आरोपीची माहिती, हरविलेले व्यक्तीची माहिती, अनोळखी मृतदेहाची माहिती, फरारी व्यक्तीची माहिती शोधता व पहाता येईल, महाराष्ट्र घटक स्थळांच्या लिंक, अ‍ॅप्लीकेशन फार्म डाऊनलोड तसेच हरविलेल्या मोबाईल बाबत सुचना देता येईल. गुन्हे सांख्यिकी माहिती, दुर्गा/शारदा उत्सव परवानगी माहिती सदर सिटीझन पोर्टलवर तक्रार कशी दाखल करावी. त्यानंतर दाखल झालेल्या तक्रारीचा निपटारा सिसीटीएनएस प्रणाली व्द्रारे कसा करता येईल, ईत्यादी माहितीचा समावेश आहे.

दैनंदिन दाखल होणारे गुन्हे सीसीटीएनएस कार्यप्रणाली मार्फत (महाराष्ट्र पोलीस सिटीजन पोर्टल)www.mhpolice.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे प्रदर्शित करण्याबाबत पोलीस अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षीत करण्यात आले आहे. व उर्वरीतांना प्रशिक्षीत करण्यात येत आहे.

जनतेनी पोलीस विभागातर्फे उपलब्ध केलेल्या सुविधांचा जास्तीत जास्त वापर करून पोलीसांना सहकार्य करावे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता